# संचालक, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा यांचे कार्यालय

मु.पो.ता.वैराट रोड, चिखलदरा ता.चिखलदरा जि.अमरावती पिन-444 807
ई-मेल-principal.mfrc933@gmail.com फोन नं.07220-230230

महाराष्ट्र वन विभाग

पुण्यश्लोक 300

जा.क्रमांक:कक्ष:-03/सं.व.प्र.सं.चि./शिलि/ 102 /2026-27 चिखलदरा 444 807, दिनांक:-07/07/2026

प्रति,
मा. उप वनसंरक्षक,
( शिक्षण व प्रशिक्षण )
म.रा.पुणे.

**विषय**:- माहे जुन 2026 ची वन शैक्षणिक वार्ता सादर करणे बाबत.

**संदर्भ**:- आपले कार्यालयीन पत्र क्रमांक : कक्ष-1/प्रशिक्षण/187/2025-26 दिनांक 25/06/2025.

उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथील नवनियुक्त अप्रशिक्षित वनरक्षक प्रशिक्षणार्थी तुकडी क्रमांक 64 मधील प्रशिक्षणार्थींचे कार्यक्रम संबंधाने सुरु असलेल्या विविध प्रशिक्षण कार्यक्रमाचा दिनांक **01/06/2026** ते 30/06/2026 पर्यंतचा मासिक शैक्षणिक अहवाल सोबत सहपत्रित करुन अवलोकनार्थ व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीस्तव सविनय सादर.

**सहपत्र**:- वरील प्रमाणे. ( पेज क्र. 01 ते 31 )

( कु. मुक्ताबाई वि. टेकाळे )
संचालक,
वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा.

Scanned with OKEN Scanner

# * प्रस्तावना *

वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा ही महाराष्ट्र राज्यातील वन विभागाच्या प्रशिक्षण क्षेत्रातील एक **अग्रगण्य व मान्यताप्राप्त** संस्था आहे. संस्थेमार्फत नवनियुक्त व कार्यरत वन कर्मचाऱ्यांना **गुणवत्तापूर्ण** आणि **शिस्तबध्द** प्रशिक्षण प्रदान करण्याचे कार्य सातत्याने करण्यात येते.

**दिनांक** 25/05/2026 पासुन संस्थेमध्ये नवनियुक्त अप्रशिक्षित **वनरक्षक** प्रशिक्षणार्थी **तुकडी क्र**. 64 यांचे सहा महिन्याचे **निवासी प्रशिक्षण** सुरु करण्यात आले आहे.

**दिनांक** 01/06/2026 **ते** 30/06/2026 या कालावधीत, संस्थेच्या **संचालक, कु. मुक्ताबाई वि. टेकाळे**, यांच्या सक्षम नेतृत्व व मार्गदर्शनाखाली प्रशिक्षणार्थींसाठी विविध शैक्षणिक, प्रात्यक्षिक, कौशल्यविकास व वनसंवर्धनास पूरक उपक्रम राबविण्यात आले. प्रशिक्षणाच्या गुणवत्तेस चालना देणारे आणि प्रशिक्षणार्थींचा सर्वांगीण विकासास हातभार लावणारे हे उपक्रम नियोजित व शिस्तबध्द पध्दतीने पार पडले.

सदर मासिक शैक्षणिक अहवालामध्ये दिनांक **01/06/2026 ते 30/06/2026** या कालावधीत राबविण्यात आलेल्या प्रशिक्षण उपक्रमांचा संक्षिप्त आढावा देण्यात आलेला आहे.

या अहवालाचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे प्रशिक्षण कार्यक्रमातील विविध शैक्षणिक व प्रात्यक्षिक घटकांची स्पष्ट, शिस्तबध्द आणि कालानुक्रमिक नोंद सादर करणे. या माध्यमातून संस्थेतील प्रशिक्षणाची कार्यपध्दती, प्रशिक्षणार्थींची प्रगती, सत्रांची परिणामकारकता, तसेच एकंदर शैक्षणिक वातावरण यांचा समावेश असलेली संपूर्ण माहिती वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचवणे अपेक्षित आहे.

हा अहवाल पुढील प्रशिक्षण सत्रांच्या नियोजनासाठी मार्गदर्शक ठरणारा असून, प्रशिक्षणाच्या गुणवत्ता नियंत्रणात तसेच धोरणात्मक निर्णय प्रक्रियेस सहाय्यक ठरेल. संस्थेमध्ये सुरु असलेल्या प्रशिक्षण उपक्रमांची पारदर्शक, संक्षिप्त व विश्लेषणात्मक माहिती या अहवालाच्या माध्यमातून प्रस्तुत करण्यात आलेली आहे.

# * अनुक्रमणिका *


| अ.क्र. | कार्यक्रमाचे नाव | पेज नं. |
|---|---|---|
| 01 | वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 64 यांचा प्रथम सत्र अभ्यासक्रम. (माहे जुन 2026) | 03 ते 08 |
| 02 | वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 64 यांचा संस्थेमध्ये क्षेत्रीय अभ्यास दौरा. ( माहे जुन 2026 ) | 09 ते 12 |
| 03 | वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 64 यांचा मरियमपूर (चिखलदरा) येथे क्षेत्रीय अभ्यास दौरा. ( दि. 16/06/2026) | 13 ते 15 |
| 04 | वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 64 यांचा गाविलगड किल्ला येथे क्षेत्रीय अभ्यास दौरा. ( दि. 20/06/2026) | 16 ते 18 |
| 05 | वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 64 यांचा संस्थेतील क्षेत्रीय कामे. (माहे जुन 2026) | 19 ते 22 |
| 06 | वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 64 यांचा कवायत व खेळ. ( माहे जुन 2026) | 23 ते 27 |
| 07 | आंतरराष्ट्रीय योग दिवस (दि. 21/06/2026 ) | 28 |
| 08 | वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 64 यांची रात्रगस्त ( माहे जुन-2026 ) | 29 |
| 09 | महाराणा प्रताप यांची जयंती. (दि. 17/06/2026 ) | 30 |
| 10 | राजर्षी छत्रपती शाहु महाराज यांची जयंती. ( 26/06/2026 ) | 31 |

**01. नवनियुक्त अप्रशिक्षित वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 64 प्रथम सत्र अभ्यासक्रम. ( दि. 01/06/2026 ते 30/06/2026 )**









## वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 64 प्रथम सत्र अभ्यासक्रम. ( दि. 01/06/2026 ते 30/06/2026 )

वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे **दि.** 25/05/2026 पासुन नवनियुक्त अप्रशिक्षित वनरक्षक प्रशिक्षणार्थी **सत्र क्र. 64** यांच्या **सहा महिने** कालावधी प्रशिक्षणाला सुरुवात झाली असुन सदर प्रशिक्षणार्थींचा प्रथम सत्र अभ्यासक्रम खाली दिलेल्या तक्ता प्रमाणे सुरु करण्यात आले.

| **अप्रशिक्षित वनरक्षक प्रशिक्षण सत्र क्र. 64 (कालावधी दि. 25/05/2026 ते 20/11/2026)** | | | |
|---|---|---|---|
| **अ. क्र** | **विषय** | **व्याख्याते** | **विषयनिहाय माहिती** |
| 01 | **कवायत व खेळ** | श्री. एस.एस. आकेवार, कवायत शिक्षक, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा.<br>श्री. महादेव धुर्वे ( कंत्राटी क.शि. व.प्र.सं.चिखलदरा ) | **कवायत व खेळ (**Drill and Sports)<br>प्रशिक्षणार्थ्यांना शारीरिक क्षमतेसाठी दैनिक कवायत व विविध खेळांचे प्रशिक्षण देण्यात आले. यामध्ये पथसंचलन, व्यायाम, लष्करी शिस्त, तसेच फुटबॉल, व्हॉलीबॉल इत्यादी खेळांचा समावेश होता.<br>**उद्देश:**<br>शारीरिक तंदुरुस्ती, टीमवर्क, व शिस्त यांचे महत्त्व पटवून देणे. |
| 02 | **वनस्पतीशास्त्र** | डॉ. कोकाटे मॅडम, सिपना कॉलेज, चिखलदरा. | **उद्देश:** वनस्पतींच्या रचनेचा, वाढीचा, वर्गीकरणाचा आणि त्यांच्या पर्यावरणाशी असलेल्या संबंधांचा अभ्यास करणे.<br>**मुख्य घटक:**<br>वनस्पतींची रचना (मूळ, खोड, पाने, फुले, बीज).<br>प्रकाशसंश्लेषण, श्वसन, पोषण प्रक्रिया.<br>वनस्पतींचे वर्गीकरण , वृक्ष, झुडपे, गवत इ.<br>वृक्षांची ओळख (Tree Identification) आणि स्थानिक जातींचे महत्त्व.<br>बीज संकलन, अंकुरण, रोपवाटिका व्यवस्थापन. |
| 03 | **वनसंवर्धन शास्त्र (भाग-01)** | श्री. एस.बी. धर्माधिकारी, सहा. वनसंरक्षक (से.नि.) | **उद्देश:** वन वृक्षांचे संवर्धन, वाढ, आणि पुनरुत्पादन यांचा अभ्यास.<br>**मुख्य घटक:**<br>वन संवर्धन परिचय, वृक्षांची वृध्दी, वनांच्या वाढीवर परिणाम करणारे घटक, वनस्पतींचे अनुक्रमण, राज्यातील महत्वाचे वनांचे प्रकार, वृक्षांचे वर्गीकरण, जोपासना, विरळणी. |
| 04 | **वृक्षांचे वनसंवर्धन व त्याचे समुपयोजन (भाग-02)** | श्री. आर.बी.गिरी, वनपरिक्षेत्र अधिकारी (से.नि.) रा. परतवाडा. | **उद्देश:** आर्थिक मूल्याच्या प्रजातींचे उत्पादन वाढवणे, प्रति युनिट वन उत्पादन वाढवणे, दर्जेदार लाकडाचे उत्पादन घेणे, दोन कापणीचे चक्रातील वर्षे कमी करणे, रिकाम्या भागात मानवनिर्मित जंगलांची निर्मीती करणे, मानवनिर्मित रोपवनांची निर्मिती करणे, विदेशी प्रजातीची वनामध्ये लागवड करणे.<br>**मुख्य घटक:**<br>सिल्विकल्चर वर्ण / गुणधर्म, निवडक वन वृक्ष प्रजातींचे वनसंवर्धन, नवीन वन निर्मिती आणि कापणीच्या पध्दती, निम्न वन प्रणाली. |
| 05 | **जैव विविधता व्यवस्थापन** | श्री. एस.बी. धर्माधिकारी, सहा. वनसंरक्षक (से.नि.) | **उद्देश:** पृथ्वीवरील विविध जीवसृष्टीचे संरक्षण व संतुलन राखणे.<br>**मुख्य घटक:** जैवविविधतेची संकल्पना आणि स्तर, आनुवंशिक, प्रजातीगत, परिसंस्थात्मक.<br>**जैवविविधतेचे महत्त्व:** पर्यावरणीय, आर्थिक, औषधी, सांस्कृतिक. स्थानिक व लुप्तप्राय प्रजातींचे संवर्धन.<br>**संरक्षित क्षेत्रे** - राष्ट्रीय उद्याने, अभयारण्ये, राखीव क्षेत्रे. |
| 06 | **जल व मृद संधारण** | श्री. अनिल लोखंडे, खाजगी अभियंता, रा.परतवाडा. | **उद्देश:** पाणी आणि मातीचे संवर्धन करून वन व कृषी उत्पादन टिकवून ठेवणे.<br>**व्याख्या** : उपलब्ध जलसंपत्तीचे संरक्षण, संवर्धन व विकास आणि तिचे उपयुक्ततापूर्ण व फायदेशीर व्यवस्थापन करणे. |
| 07 | **कुरण विकास व्यवस्थापन** | प्रा. जी. डी. मुरतकर, सिपना कॉलेज, चिखलदरा. | **उद्देश** : पशुधन व वन्यजीवांसाठी शाश्वत चारापूरवठा उपलब्ध करणे. कुरणांची माती, पाणी व जैवविविधता सुधारणा करणे.<br>**मुख्य घटक**: कुरणांचे सर्वेक्षण, मृद व हवामान मूल्यांकन गवत लागवड, सुधारणा व व्यवस्थापन चाराप्रकार, वन्यजीवांसाठी चराईक्षेत्र विकास. |

| | | | |
|---|---|---|---|
| 08 | **वन्यजीव व्यवस्थापन** | श्री. एस.एम. सुरजुसे, सहा. वनसंरक्षक (से.नि.) | **उद्देश** : वन्यजीवांचे संरक्षण, संवर्धन व त्यांचा नैसर्गिक अधिवास टिकवणे. जैवविविधता संतुलित ठेवणे.<br>**मुख्य घटक**: अधिवास संरक्षण, परिसंस्था संवर्धनवन्यजीव गणना, निरीक्षण व संशोधनमानव-वन्यजीव संघर्ष नियंत्रणसंरक्षित क्षेत्रांचे नियोजन. |
| 09 | **वनमिती** | श्री. एस.एन.गुल्हाने, सहा. वनसंरक्षक (से.नि.) | **उद्देश** : जंगलातील लाकूडसंपत्तीचे अचूक मूल्यांकन करणे. कार्ययोजना व वनसंपत्ती व्यवस्थापनासाठी आवश्यक माहिती उपलब्ध करणे.<br>**मुख्य घटक**: वृक्ष मापन पद्धती (उंची, व्यास, घनफळ) वनक्षेत्र सर्वेक्षण तंत्रनमुना सर्वेक्षण व डेटा विश्लेषण. |
| 10 | **पुनरुत्पादन पध्दती ( वनसंवर्धन शास्त्र भाग**-3) | कु. मुक्ताबाई वि. टेकाळे, संचालक, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा. | **उद्देश**: जंगलांचा सातत्यपूर्ण वाढीचा वेग टिकवून ठेवणे. हरितक्षेत्र वाढवणे व लाकूडसंपत्तीची स्थिर उपलब्धता सुनिश्चित करणे.<br>**मुख्य घटक**: प्राकृतिक पुनरुत्पादन (बी उगवण, अंकुरोत्पादन) कृत्रिम पुनरुत्पादन (लागवड, बियाणे पेरणी, रोपवाटिका) कापणी पद्धती, पुनरुत्पादन निरीक्षण, वनांची पुनरुत्पती, नैसर्गिक पुनरुत्पत्ती, मियावाकी वृक्षारोपन पध्दती. |





# वनरक्षक सत्र क्र. 64 प्रथम सत्र अभ्यासक्रम.







वरील सर्व विषय वनरक्षक प्रशिक्षणाचा मूलभूत पाया आहेत. या अभ्यासक्रमामुळे प्रशिक्षणार्थींला वनव्यवस्थापन, पर्यावरण संरक्षण, जैवविविधतेचे संवर्धन आणि कायदेशीर चौकटीत राहून वनसेवा कार्यक्षमतेने पार पाडण्याची क्षमता प्राप्त होते.

## वनरक्षक सत्र क्र. 64 प्रथम सत्र अभ्यासक्रम.









# वनरक्षक सत्र क्र. 64 प्रथम सत्र अभ्यासक्रम.









## 02. वनरक्षक सत्र क्र. 64 मधील प्रशिक्षणार्थींचे प्रथम सत्र अभ्यासक्रमादरम्यान संस्थेतील परीसरामध्ये क्षेत्रीय अभ्यास दौरा. ( माहे जुन 2026 )
## ( विषय: जल व मृद संधारण, व्याख्याते श्री. अनिल लोखंडे, खाजगी अभियंता )







जल व मृद संधारणाच्या कामांची पाहणी करून त्यांची रचना, कार्यपध्दती आणि उपयोग याविषयी प्रशिक्षणार्थींना प्रत्यक्ष माहिती देण्यात आली.

**( विषय: वनस्पतीशास्त्र, व्याख्याते डॉ. कोकाटे मॅडम, सिपना कॉलेज, चिखलदरा.)**





परीसरातील विविध वनस्पतींची ओळख करुन देण्यात आली. वनस्पतींचे शास्त्रीय नाव, स्थानिक नाव व कुटुंब यांची माहिती सांगण्यात आली. तसेच मुळ, खोड, पाने, फुले व फळे यांच्या रचना व कार्यानुसार अभ्यास करण्यात आला. औषधी, खाद्य व आर्थिक दृष्ट्या उपयुक्त वनस्पतींचे महत्व स्पष्ट करण्यात आले. या सोबतच वनस्पतींचे नमुने कसे गोळा करावेत व जतन कसे करावे याबाबत मार्गदर्शन केले. व पर्यावरण संवर्धन व जैवविविधतेचे महत्व प्रशिक्षणार्थ्यांना समजावून सांगण्यात आले.

( विषय: वनमिती, व्याख्याते श्री. एस.एन. गुल्हाने, सहा. वनसंरक्षक ( से.नि. )







वनक्षेत्रात प्रत्यक्ष जाऊन वृक्षांची उंची, घेर / व्यास, आयतन मोजणी, नमुना क्षेत्र निश्चिती, आवश्यक मोजमाप साधनांचा वापर तसेच वनमिती विषयक विविध मोजमाप पध्दतींबाबत मार्गदर्शन करण्यात आले. प्रशिक्षणार्थीनी प्रत्यक्ष क्षेत्रीय कामामध्ये सहभाग घेऊन वनमिती विषयक प्रात्यक्षिके पुर्ण केली व आवश्यक कौशल्य आत्मसात केले.





वनाच्या वाढीच्या तीन अवस्था आणि आकार नुसार वनाच्या वाढीचे प्रकार या बाबत माहिती दिली. याचबरोबर वनाच्या ज्या अवस्था असतात प्राथमीक अनुक्रमन व द्वितीय अनुक्रमन याची माहिती प्रत्यक्ष देण्यात आली. तसेच विरळणी खुरपनी यासारखे विकासात्मक कामे व जोपासात्मक कामे प्रशिक्षणार्थ्यांकडुन प्रत्यक्ष करवुन घेण्यात आले. तसेच जैवविविधता म्हणजे काय याची सुध्दा माहिती प्रत्यक्ष स्वरुपात प्रशिक्षणार्थींना देण्यात आली.

## 03. **मरियमपूर (चिखलदरा) येथे कुरण विकास व व्यवस्थापनबाबत क्षेत्रीय अभ्यास दौरा**.

**( दि. 16/06/2026 )**

वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे सुरु असलेले नवनियुक्त अप्रशिक्षित वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 64 यांचा दिनांक 16/06/2026 रोजी **मेळघाट वन्यजीव विभाग, परतवाडा** अंतर्गत असलेल्या **मरियमपूर बीट** येथे **कुरण विकास व व्यवस्थापनबाबत** क्षेत्रीय अभ्यास दौरा करण्यात आला. सदर दौरा हा कु. मुक्ताबाई वि. टेकाळे, संचालक, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आला. तसेच सदर प्रशिक्षणार्थींना प्रा.जी.डी. मुरतकर, सिपना कॉलेज, चिखलदरा व श्री. अनंता डिगोळे, विभागीय वन अधिकारी, मेळघाट वन्यजीव विभाग, परतवाडा यांनी योग्य मार्गदर्शन केले.

सदर अभ्यास दौऱ्यादरम्यान प्रशिक्षणार्थींना विविध प्रकारच्या गवताचे बियाणे उपलब्ध करुन देण्यात आले. तसेच मृद व जलसंधारण, वनक्षेत्रातील गवत संवर्धन आणि नैसर्गिक पुनरुत्पादन याविषयी प्रात्यक्षिक प्रशिक्षणाचा भाग म्हणून संबंधित ठिकाणी सदर गवत बियाण्यांची लागवड करण्याचे मार्गदर्शन करण्यात आले. **प्रशिक्षणार्थींनी प्रत्यक्ष क्षेत्रात गवत बियाण्यांची लागवड करुन कार्यक्रमात सक्रिय सहभाग नोंदविला**.

सदर उपक्रमाचा उद्देश प्रशिक्षणार्थींमध्ये वनसंवर्धन, कुरण विकास, मृद संरक्षण तसेच क्षेत्रीय कामकाजाबाबत व्यावहारिक ज्ञान व कौशल्य विकसित करणे हा होता.





**मरियमपूर (चिखलदरा) येथे कुरण विकास व व्यवस्थापनबाबत क्षेत्रीय अभ्यास दौरा.**











मरियमपूर (चिखलदरा) येथे कुरण विकास व व्यवस्थापनबाबत क्षेत्रीय अभ्यास दौरा.






## 04. गाविलगड किल्ला येथे कुरण विकास व व्यवस्थापनबाबत क्षेत्रीय अभ्यास दौरा. ( दि. 20/06/2026 )

वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे सुरु असलेले नवनियुक्त अप्रशिक्षित वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 64 यांचा दिनांक 20/06/2026 रोजी **गाविलगड किल्ला, चिखलदरा** येथे **कुरण विकास व व्यवस्थापनबाबत क्षेत्रीय** अभ्यास दौरा करण्यात आला. सदर दौरा हा कु. मुक्ताबाई वि. टेकाळे, संचालक, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आला. तसेच सदर प्रशिक्षणार्थींना श्री. अनंता डिगोळे, विभागीय वन अधिकारी, मेळघाट वन्यजीव विभाग, परतवाडा यांनी योग्य मार्गदर्शन केले व सदर क्षेत्र हे मेळघाट वन्यजीव विभाग परतवाडा, अंतर्गत गाविलगड परिक्षेत्र, चिखलदरा मध्ये येते.

सदर अभ्यास दौऱ्यादरम्यान प्रशिक्षणार्थींना विविध प्रकारच्या गवताचे बियाणे उपलब्ध करुन देण्यात आले. तसेच मृद व जलसंधारण, वनक्षेत्रातील गवत संवर्धन आणि नैसर्गिक पुनरुत्पादन याविषयी प्रात्यक्षिक प्रशिक्षणाचा भाग म्हणून संबंधित ठिकाणी सदर गवत बियाण्यांची लागवड करण्याचे मार्गदर्शन करण्यात आले. **प्रशिक्षणार्थींनी प्रत्यक्ष क्षेत्रात गवत बियाण्यांची लागवड करुन कार्यक्रमात सक्रिय सहभाग नोंदविला**.

सदर उपक्रमाचा उद्देश प्रशिक्षणार्थींमध्ये वनसंवर्धन, कुरण विकास, मृद संरक्षण तसेच क्षेत्रीय कामकाजाबाबत व्यावहारिक ज्ञान व कौशल्य विकसित करणे हा होता.





गाविलगड किल्ला येथे कुरण विकास व व्यवस्थापनबाबत क्षेत्रीय अभ्यास दौरा.







गाविलगड किल्ला येथे कुरण विकास व व्यवस्थापनबाबत क्षेत्रीय अभ्यास दौरा.









05. वनरक्षक सत्र क्र.64 मधील प्रशिक्षणार्थींचे संस्थेतील क्षेत्रीय कामे. ( माहे जुन 2026)

ओपन जीम येथील परीसराची साफसफाई ( दि. 06/06/2026 )









## टाईप-III व गावीलगड वसतीगृह येथील Water Harvesting चे पन्हाळे व पाण्याचे टाके साफसफाई









# अमृत वन येथील परीसराची साफसफाई ( दि. 13/06/2026)











# रायमुनिया उच्चाटन-क्षेत्रीय कामे ( दि. 27/06/2026)







06. वनरक्षक सत्र क्र. 64 मधील प्रशिक्षणार्थींचे कवायत व खेळ. ( माहे जुन 2026 )







# प्रशिक्षणार्थींचे कवायत व खेळ









# प्रशिक्षणार्थींचे कवायत व खेळ





नवनियुक्त अप्रशिक्षित वनरक्षक प्रशिक्षणार्थी यांना सहा महिन्यांच्या प्रशिक्षण कालावधीत दररोज नियमितपणे शारीरिक कवायत, व्यायाम व विविध मैदानी खेळांचे प्रशिक्षण दिले जाते. प्रशिक्षणाचा एक भाग म्हणून प्रशिक्षणार्थींकडून ५ किलोमीटर धावणे (रनिंग) करून घेतले जाते. तसेच शारीरिक क्षमता, सहनशक्ती, शिस्त, संघभावना आणि कार्यकुशलता विकसित करण्याच्या उद्देशाने विविध प्रकारचे मैदानी खेळ व शारीरिक प्रशिक्षणाचे उपक्रम आयोजित केले जातात. या प्रशिक्षणामुळे प्रशिक्षणार्थी शारीरिक व मानसिकदृष्ट्या सक्षम होऊन वनरक्षक पदाची जबाबदारी प्रभावीपणे पार पाडण्यास तयार होतात.

सदर प्रशिक्षणार्थींना एस.एस. आकेवार, कवायत शिक्षक, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा व महादेव धुर्वे, कंत्राटी सहा. कवायत शिक्षक, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा यांनी योग्य ते मार्गदर्शन केले.

# प्रशिक्षणार्थींचे कवायत व खेळ





Carry the Person (Recreational Game) हा एक सांघिक मनोरंजनात्मक व शारीरिक तंदुरुस्ती वाढविणारा खेळ आहे. या खेळामध्ये सहभागी एकमेकांना सुरक्षित पद्धतीने निश्चित अंतरापर्यंत वाहून नेतात. या प्रक्रियेद्वारे सहभागींच्या शारीरिक क्षमतेसह समन्वय, संतुलन, सहकार्य आणि परस्पर विश्वासाचा विकास होतो.

सदर खेळ नियमितपणे मैदानावर घेतल्यास प्रशिक्षणार्थींमध्ये संघभावना, नेतृत्वगुण, निर्णयक्षमता, संवाद कौशल्य तसेच जबाबदारीची भावना विकसित होते. खेळादरम्यान प्रत्येक सदस्याला संघातील इतर सदस्यांशी समन्वय साधून कार्य करावे लागत असल्यामुळे परस्पर सहकार्याची भावना अधिक दृढ होते.

Carry the Person हा खेळ प्रशिक्षणार्थींच्या शारीरिक तंदुरुस्तीबरोबरच मानसिक तयारी, सांघिक कार्यपद्धती, समन्वय आणि आत्मविश्वास वाढविण्यास उपयुक्त असून नियमित सरावामुळे प्रशिक्षणार्थी अधिक सक्षम, शिस्तबद्ध व कार्यक्षम बनतात. सदर प्रशिक्षणार्थींना एस.एस. आकेवार, कवायत शिक्षक, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा यांनी योग्य ते मार्गदर्शन केले.

## प्रशिक्षणार्थींचे कवायत व खेळ.









## 07. आंतरराष्ट्रीय योग दिवस (दि. 21/06/2026 )

### आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा

दिनांक 21/06/2026 रोजी वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे अप्रशिक्षित वनरक्षक सत्र **क्र**. 64 यांच्या वतीने **आंतरराष्ट्रीय योग दिन** उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या निमित्ताने प्रशिक्षणार्थींना योगाचे महत्त्व, त्याचे शारीरिक व मानसिक आरोग्यावर होणारे सकारात्मक परिणाम याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. तसेच प्रशिक्षणार्थींना विविध योगासने, प्राणायाम व ध्यानाचा प्रत्यक्ष सराव करून घेण्यात आला. सर्व प्रशिक्षणार्थींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून नियमित योगाभ्यास करण्याचा संकल्प केला. सदर प्रशिक्षणार्थींना एस.एस. आकेवार, कावायत शिक्षक, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा व  महादेव धुर्वे, कंत्राटी सहा. कवायत शिक्षक, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा यांनी योग्य मार्गदर्शन केले.





# 08. वनरक्षक प्रशिक्षणार्थी यांची रात्रगस्त ( माहे जुन-2026 )









## 09. **महाराणा प्रताप यांची जयंती**. ( **दि**. 17/06/2026 )



वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे दि. 17/06/2026 रोजी **महाराणा प्रताप** यांची जयंती आदरपुर्वक व अत्यंत उत्साहात साजरी करण्यात आली. सदर कार्यक्रमात उपस्थित संस्थेतील अधिकारी / कर्मचारी व वनरक्षक सत्र क्र. 64 मधील प्रशिक्षणार्थी यांच्या उपस्थितीत सदर कार्यक्रम साजरा करण्यात आला.

महाराणा प्रताप यांचे संपूर्ण जीवन हे राष्ट्रप्रेम, स्वाभिमान, पराक्रम, त्याग, कर्तव्यनिष्ठा आणि अदम्य इच्छाशक्ती यांचे तेजस्वी प्रतीक आहे. प्रतिकूल परिस्थितीतही त्यांनी आपल्या मातृभूमीच्या स्वातंत्र्याचे रक्षण करण्यासाठी अखंड संघर्ष केला. कोणत्याही प्रकारच्या प्रलोभनाला किंवा दबावाला बळी न पडता स्वाभिमानाने जीवन जगण्याचा आदर्श त्यांनी समाजासमोर ठेवला. त्यांचे जीवनचरित्र प्रत्येक भारतीयासाठी प्रेरणादायी असून राष्ट्रनिष्ठा आणि कर्तव्यपरायणतेचा अमूल्य वारसा आहे.

महाराणा प्रताप जयंती हा केवळ ऐतिहासिक स्मरणाचा दिवस नसून राष्ट्रप्रेम, धैर्य, त्याग आणि सामाजिक उत्तरदायित्व यांचा जागर करण्याचा प्रेरणादायी दिवस आहे. त्यांच्या विचारांचा आणि कार्याचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून प्रत्येक नागरिकाने संविधानातील मूल्यांचा सन्मान करणे, राष्ट्रीय एकात्मता दृढ करणे, सामाजिक सलोखा राखणे आणि प्रामाणिकपणे आपल्या कर्तव्यांचे पालन करणे आवश्यक आहे. विशेषतः युवकांनी शिक्षण, शिस्त, परिश्रम, नैतिकता आणि राष्ट्रसेवा या मूल्यांचा स्वीकार करून समाजाच्या सर्वांगीण विकासात सक्रिय योगदान द्यावे.

## 10. **राजर्षी छत्रपती शाहु महाराज यांची जयंती**. ( दि. 26/06/2026 )





वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे दि. 26/06/2026 रोजी **राजर्षी छत्रपती शाहु महाराज** यांची जयंती आदरपुर्वक व अत्यंत उत्साहात साजरी करण्यात आली. सदर कार्यक्रमात उपस्थित संस्थेतील अधिकारी / कर्मचारी व वनरक्षक सत्र क्र. 64 मधील प्रशिक्षणार्थी यांच्या उपस्थितीत सदर कार्यक्रम साजरा करण्यात आला.

राजर्षी छत्रपती शाहू महाराज हे भारतातील महान समाजसुधारक, दूरदृष्टीचे राज्यकर्ते आणि शिक्षणप्रेमी होते. त्यांचा जन्म **२६ जून १८७४** रोजी झाला. समाजातील दुर्बल, शोषित आणि वंचित घटकांच्या उन्नतीसाठी त्यांनी आयुष्यभर कार्य केले. म्हणूनच त्यांना "लोककल्याणकारी राजा" म्हणून ओळखले जाते.

शाहू महाराजांचा ठाम विश्वास होता की समाजाचा विकास शिक्षणाशिवाय शक्य नाही. त्यांनी सर्व समाजघटकांसाठी शिक्षणाची दारे खुली केली. गरीब विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे, शिष्यवृत्ती आणि मोफत शिक्षणाच्या अनेक योजना सुरू केल्या. मुलींच्या शिक्षणालाही त्यांनी विशेष प्रोत्साहन दिले.

सामाजिक समतेसाठी त्यांनी अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले. जातीभेद, अस्पृश्यता आणि सामाजिक अन्याय दूर करण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. सन **१९०२** मध्ये त्यांनी सरकारी नोकऱ्यांमध्ये मागासवर्गीयांसाठी आरक्षणाची ऐतिहासिक घोषणा केली. हा निर्णय सामाजिक न्यायाच्या दिशेने उचललेले महत्त्वपूर्ण पाऊल मानला जातो.

शाहू महाराजांनी शेती, उद्योग, सहकार आणि क्रीडा क्षेत्रालाही चालना दिली. शेतकऱ्यांच्या हितासाठी विविध योजना राबवून त्यांच्या आर्थिक प्रगतीसाठी प्रयत्न केले. कला, साहित्य आणि संस्कृतीचे जतन व संवर्धन करण्यासाठीही त्यांनी मोलाचे योगदान दिले.

दरवर्षी **२६ जून** रोजी शाहू महाराज जयंती मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. या दिवशी त्यांच्या कार्याचे स्मरण करून विविध शैक्षणिक, सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले जातात. विद्यार्थ्यांना त्यांच्या विचारांचा परिचय करून दिला जातो आणि सामाजिक समतेचा संदेश दिला जातो.

राजर्षी शाहू महाराजांचे जीवन आपल्याला समता, बंधुता, शिक्षण आणि मानवतेचे महत्त्व शिकवते. त्यांचे विचार आजही समाजाला प्रेरणा देणारे आहेत. त्यांच्या जयंतीनिमित्त आपण शिक्षणाचा प्रसार, सामाजिक न्याय आणि सर्वांना समान संधी मिळावी यासाठी प्रयत्न करण्याचा संकल्प केला पाहिजे. हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.